2 2 APR 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

### प्रवेश सूचना २०२६-२७

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व एआयसीटीई मान्यता प्राप्त खालील अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| पदवी व पदव्युत्तर डिस्टन्स मोड | बी.ए. व बी.कॉम. | https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/#/login |
| | एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र) एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. | |
| | एम.बी.ए. | https://sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login |
| पदव्युत्तर ऑनलाईन मोड | एम.बी.ए., एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. | |
| ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम | | https://sukapps.unishivaji.ac.in/lms_stud_reg_app/#/login |

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी दि.२२/०४/२०२६ ते दि.१०/०६/२०२६ पर्यंत प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावेत. याबाबतची सविस्तर माहिती व सूचना **https://www.unishivaji.ac.in/distedu/** या विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र.दूरशिक्षण/२१४
दि. २२/०४/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

2 2 APR 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## प्रवेश सूचना २०२६-२७

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व एआयसीटीई मान्यता प्राप्त खालील अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| पदवी व पदव्युत्तर डिस्टन्स मोड | बी.ए. व बी.कॉम. | https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/8/login |
| | एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र) एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. | |
| | एम.बी.ए. | https://sukapps.unishivaji.ac.in/ppenrollment/8/login |
| पदव्युत्तर ऑनलाईन मोड | एम.बी.ए., एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. | |
| ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम | | https://sukapps.unishivaji.ac.in/lms_stud_reg_app/8/login |

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी दि.२२/०४/२०२६ ते दि.१०/०६/२०२६ पर्यंत प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावेत. याबाबतची सविस्तर माहिती व सूचना https://www.unishivaji.ac.in/distedu/ या विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र.दूरशिक्षण/२१४
दि. २२/०४/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

2 2 APR 2026

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील १७३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील १७३ परीक्षा मंगळवारी सुरळीतपणे झाल्या. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बीव्होक, बीकॉम, बीए, बीबीए, बीएस्सी, एमबीए, एमएबीएड, बीएसडब्ल्यू, एमसीए, पीजी डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, पीजी डिप्लोमा इन जर्नालिझम आदी परीक्षांना ४७ हजार ५३४ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

2 2 APR 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठाच्या ९४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

- सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची नोंद



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल-२०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. २१ एप्रिल रोजी विविध ९४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १७३ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या असून या परीक्षांसाठी ४७५३४ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, मंगळवारी सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद झाली आहे.

विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. २१ एप्रिल रोजी सदर पथकाकडून सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे. सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

2 2 APR 2026

सकाळ

# महात्मा फुले- महर्षी शिंदे यांच्या अनुबंधाविषयी उद्या चर्चासत्र

कोल्हापूर : महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने गुरुवारी (ता. २३) शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे : अनुबंधांचा अन्वयार्थ' असा चर्चासत्राचा विषय आहे. उद्‌घाटन डॉ. राजन गवस यांच्या हस्ते होईल. प्रा. सुशील धसकटे बीजभाषण करणार आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी असतील. त्यानंतर विविध सत्रात उद्धव धुमाळे, प्रा. डॉ. प्रकाश पवार, रमेश चव्हाण, डॉ. भक्ती महाजन, सुरेश शिखरे, मोहसीन पठाण, प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य डॉ. शंकरराव कदम मार्गदर्शन करणार असल्याची माहिती मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

2 2 APR 2026 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जनसंपर्कात सत्य, नैतिकता महत्त्वाची

## 'पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टर'च्या उद्‌घाटनप्रसंगी उपसंचालक प्रवीण टाके यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

'कोरोना साथीनंतर जनसंपर्क क्षेत्र अधिक महत्वाचे झाले आहे, पण विश्वासार्हता टिकवणे हे महत्वाचे आहे. तसेच एआय टूलच्या वापरामुळे कामास गती मिळते मात्र आपत्कालीन स्थितीतही सत्य आणि नैतिकता जपणे आवश्यक आहे, असे मत विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी व्यक्त केले. ते 'पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टर'च्या उदघाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, कोल्हापूर चॅप्टरच्या अध्यक्ष प्रा. डॉ. निशा मुडे–पवार, सचिव विश्वजीत भोसले, कोषाध्यक्ष सचिन मोरे उपस्थित होते.



कोल्हापूर : पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टरचे उद्‌घाटन प्रवीण टाके यांनी रोपट्यास पाणी घालून सोबत डॉ. रवींद्र चिंचोलकर, प्रा. डॉ. निशा मुडे–पवार, विश्वजीत भोसले, सचिन मोरे आदी.

### योग्य माहिती दिल्यास नंतर खुलासा करण्याची गरज नाही

अंकुश चव्हाण म्हणाले, आपत्कालीन स्थितीत पहिले काही तास 'गोल्डन अवर' म्हणून महत्वाचे असतात. यंत्रणेने नेमके काय चुकले ते शोधून दुरुस्ती करणे गरजेचे असते. घटना घडल्यानंतर माध्यमांना तत्काळ योग्य माहिती दिल्यास नंतर खुलासा करण्याची गरज पडत नाही.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे माजी विद्यार्थी व भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी वारणा कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, माझगाव डॉकचे माध्यम सल्लागार पी.एस. पाटील, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, माहिती अधिकारी वृषाली पाटील, आकाशवाणी पुणे वृत्त विभागाचे माधव जायभाई, कोल्हापूर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र पारिजात, जेष्ठ पत्रकार डॉ. दशरथ पारेकर, पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या डॉ. वृषाली बर्गे, विवेक सिद्ध, सचिन मोरे, सरदार जाधव, विवेक पोर्लेकर, तिटवे कॉलेजचे दिग्विजय कुंभार, रोहिणी साळुंखे, डायमंड हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी सुनील भस्मे आदीनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनुराधा ईनामदार व डॉ. चंद्रशेखर वानखेडे यांनी केले.

कार्यक्रमास कार्यकारणी सदस्य, जनसंपर्क, जाहिरात, विविध माध्यम क्षेत्रात कार्यरत व्यक्ती तसेच माध्यम क्षेत्रातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टर आणि पत्रकारिता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

### एआयच्या काळात माहितीची सत्यता तपासणे आवश्यक

डॉ. रवींद्र चिंचोलकर म्हणाले, 'जनसंपर्क आणि सत्य' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एआयच्या काळात माहितीची सत्यता तपासणे आवश्यक बनले आहे. जनसंपर्क व माध्यमातील सर्वांनाच प्रॉम्प्ट ट्रेनिंग आवश्यक आहे. एआयचा वापर शिकल्यास नोकऱ्यांची संधी उपलब्ध असेल. 'पीआरएसआय'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खासगी क्षेत्रात कामाची संधी मिळू शकते.

2 2 APR 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या चर्चासत्र

कोल्हापूर : महात्मा जोतिबा फुले यांच्या नुकत्याच झालेल्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले व महर्षी शिंदे : अनुबंधांचा अन्वयार्थ या विषयावर गुरुवार २३ रोजी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात हे चर्चासत्र होईल. चर्चासत्राचे सकाळी ११ वाजता प्रा. राजन गवस यांच्या हस्ते उद्घाटन केले जाईल. यावेळी पुण्यातील प्रा. सुशील धसकटे यांचे बीजभाषण होईल. पुण्यातील उद्धव धुमाळे हे महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांचे स्त्रीविषयक कार्य व दृष्टीकोन तर प्रकाश पवार हे महर्षी शिंदे यांच्या वाङ्मयातील फुले अनुबंध या विषयावर मार्गदर्शन करतील. तसेच पुण्यातील रमेश चव्हाण यांचे महर्षी शिंदे : महात्मा फुले कार्याचा विस्तार या विषयावर मार्गदर्शन होईल. दुपारी २ ते ४ यावेळेत गोव्यातील डॉ. भक्ती महाजन, कोल्हापुरातील डॉ. सुरेश शिखरे, मोहसिन पठाण व प्रा. नंदकुमार मोरे हे आपले विचार मांडणार आहे. साडे चार वाजता प्राचार्य डॉ. शंकरराव कदम (कराड) व प्रकाश पवार यांच्या मार्गदर्शनाने समारोप होईल, अशी माहिती मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

2 2 APR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या चर्चासत्र

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने गुरुवारी (दि.२३) शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभाग व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात 'महात्मा फुले व महर्षी शिंदे : अनुबंधांचा अन्वयार्थ' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांच्या हस्ते होईल. प्रा. सुशील धसकटे बीजभाषण करणार आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी असतील. दुसऱ्या सत्रात 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा अन्वयार्थ' या विषयावर मांडणी होईल. द्वितीय सत्र 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा सामाजिक-सांस्कृतिक अनुबंध' या विषयावर असेल. समारोप सत्रात प्राचार्य डॉ. शंकरराव कदम (कराड) मार्गदर्शन करणार आहेत.

2 2 APR 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अंतिम पाच उमेदवारांच्या निवडीकडे लक्ष

## कुलगुरू निवड प्रक्रिया; शोध समितीच्या पातळीवरील मुलाखती पूर्ण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेतील अंतिम मुलाखतीसाठी पाच उमेदवारांच्या निवडीकडे विद्यापीठ घटकांचे लक्ष लागले आहे. या उमेदवारांच्या निवडीसाठी विविध २८ उमेदवारांच्या मुलाखतींची प्रक्रिया कुलगुरू शोध समितीने दोन आठवड्यांपूर्वी पूर्ण केली आहे.

या समितीकडे ११५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. या अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण होवून २८ उमेदवारांची नावे या समितीच्या पातळीवर होणाऱ्या मुलाखतीसाठी शॉर्टलिस्ट झाली. त्यांच्या मुलाखतीची प्रक्रिया या समितीने मुंबई येथे तीन आणि चार एप्रिलला पूर्ण केली.

मुलाखत देणाऱ्या उमेदवारांमध्ये डॉ. होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.

> विद्यापीठ कुलगुरू निवड प्रक्रियेतील अंतिम पाच पात्र उमेदवारांच्या मुलाखती लवकर व्हाव्यात आणि एक मे रोजी विद्यापीठाला नवीन कुलगुरू मिळावेत, अशी शासनाकडून अपेक्षा आहे.
>
> **- ॲड. स्वागत परूळेकर,**
> सदस्य, व्यवस्थापन परिषद

ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एस. एस. चव्हाण, आर. जी. सोनकवडे, श्रीकृष्ण महाजन, एस. एस. कोळेकर, पुणे विद्यापीठामधील डॉ. संजय ढोले, संजय चाकणे, विलास खरात, राजेंद्र देशमुख, सतीश पाटील, ए. एम. महाजन, नितीन देसाई, विजय खरे, स्मिता देशमुख, राजेश गच्चे, डॉ. बेलनकर, प्रा. डॉ. जोगी आणि एनआयटीमधील राजेंद्र काकडे यांचा समावेश होता. या प्रक्रियेनंतर अंतिम



मुलाखतीसाठी पाच उमेदवारांची नावे कुलपती कार्यालयाकडे पाठविली जातात. त्यामध्ये कोणत्या पाच जणांचा समावेश आहे आणि अंतिम मुलाखती कधी होणार, याकडे विद्यापीठ घटकांचे लक्ष लागले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 APR 2026 पुढारी

# कोल्हापूरच्या मातीत दडलाय निसर्गाचा अदृश्य 'इंजिनिअर'

## दारकरी कोळ्याची नवी प्रजाती उजेडात; 'टायटॅनिडिओप्स कोल्हापुरेन्सिस' केले नामकरण

- शिवाजी विद्यापीठ व ठाकरे वाईल्ड लाईफ फाऊंडेशनचे संयुक्त संशोधन
- दृष्टी मर्यादित तरी सूक्ष्म कंपन ओळखून करतो अचूक शिकार




### अस्तित्वाला धोका

मादी कोळी ४३ वर्षांपर्यंत जगू शकते. या कोळ्यांच्या अस्तित्वाला वाढते शहरीकरण, रस्ते, बांधकामे आणि परदेशी वृक्षांच्या लागवडीने धोका निर्माण झाला आहे.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूरच्या जैवविविधतेत आणखी एका महत्त्वपूर्ण शोधाची भर पडली आहे. निसर्गसंपन्न कोल्हापूर परिसरात संशोधकांनी 'ट्रॅपडोअर' प्रकारच्या कोळ्याची एक दुर्मीळ आणि नवी प्रजाती शोधून काढली. स्थानिक भाषेत 'दारकरी कोळी' म्हणून ओळखणाऱ्या या कोळ्याचे 'टायटॅनिडिओप्स कोल्हापुरेन्सिस' असे नामकरण केले आहे.

शिवाजी विद्यापीठातील संशोधक आणि ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हा शोध लागला. त्याचा सर्व तपशील आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'जर्नल ऑफ नॅचरल हिस्ट्री'मध्ये प्रसिद्ध झाला. यामुळे याची जागतिक स्तरावर दखल घेतली गेली.

'ट्रॅपडोअर' तंत्रज्ञान हे या कोळ्याचे मोठे वैशिष्ट्य आहे. हे जमिनीत सुमारे १०० सेंटिमीटर किंवा त्याहून अधिक खोल बीळ तयार करतात. त्याला माती, लाळ आणि कोळ्याच्या जाळ्यापासून बनवलेले घट्ट झाकण म्हणजेच 'दार' असते. हे दार जमिनीशी मिळतेजुळते असते. ते मानवी डोळ्यांना सहज दिसत नाही. यामुळेच त्याला 'दारकरी' असे म्हटले जाते. दृष्टी मर्यादित असली तरी अंगावरील केस आणि संवेदना अत्यंत तीव्र असतात. जमिनीवरील सूक्ष्म कंपने ओळखून तो अंधारातही अचूक शिकार करतो. भक्ष्य दाराजवळ येताच, क्षणात बाहेर येऊन त्याला पकडतो व पुन्हा बिळात जाऊन दार लावून घेतो.

2 2 APR 2026

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी 'पीआरएसआय' कोल्हापूर चॅप्टरचे उद्‌घाटन विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून झाले. यावेळी प्रा. डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. रवींद्र चिंचोलकर, अंकुश चव्हाण, डॉ. प्रताप पाटील, विश्वजित भोसले उपस्थित होते.

# जनसंपर्कासाठी सत्यता, नैतिकता महत्त्वाची : टाके

## पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टरचे विद्यापीठात उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : 'कोरोना साथीनंतर जनसंपर्क क्षेत्राला अधिक महत्त्व आले आहे, तरीही त्यामध्ये विश्वासार्हता टिकवणे फार महत्त्वाचे आहे. तसेच ए.आय.च्या वापरामुळे गती मिळते, परंतु आपत्कालीन स्थितीतही सत्य आणि नैतिकता जपणे गरजेचे आहे,' असे मत विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागाच्या सभागृहात झालेल्या पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय)च्या कोल्हापूर चॅप्टर उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, कोल्हापूर चॅप्टरच्या अध्यक्ष प्रा. डॉ. निशा मुडे-पवार, सचिव विश्वजित भोसले, कोषाध्यक्ष सचिन मोरे उपस्थित होते. डॉ. चिंचोलकर म्हणाले, "जनसंपर्क आणि सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एआयच्या काळात माहितीची सत्यता तपासणे आवश्यक बनले आहे." चव्हाण म्हणाले, "घटना घडल्यानंतर माध्यमांना तत्काळ योग्य माहिती दिल्यास नंतर खुलासा करण्याची गरज पडत नाही." डॉ. अनुराधा इनामदार व डॉ. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, माहिती अधिकारी वृषाली पाटील, महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी, ज्येष्ठ पत्रकार डॉ. दशरथ पारेकर, माझगाव डॉकचे माध्यम सल्लागार पी. एस. पाटील, पुणे आकाशवाणीचे माधव जायभाई, डॉ. राजेंद्र पारिजात, पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या डॉ. वृषाली बर्गे, विवेक सिद्ध, दिग्विजय कुंभार, रोहिणी साळुंखे, सुनील भस्मे उपस्थित होते.

22 APR 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात शिकण्यासाठी ३,४५७ विद्यार्थी इच्छुक

## अर्ज करण्याची मुदत सोमवारपर्यंत

कोल्हापूर, ता. २१ : नव्या शैक्षणिक वर्षात विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिवाजी विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी ३ हजार ४५७ विद्यार्थी इच्छुक आहेत. त्यांनी प्रवेशित होण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज भरले आहेत.

एम. एस्सी., फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी, झूलॉजी, बायोकेमिस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी, मॅथेमेटिक्स, अशा २९ अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाकडून प्रवेश परीक्षा होणार आहे. प्रवेश परीक्षा नसलेले २१ अभ्यासक्रम आहेत. या सर्व अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरू झाली. त्याअंतर्गत आजअखेर एकूण ३ हजार ४५७ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले. त्यात प्रवेश परीक्षांसाठी दाखल झालेल्या अर्जांची संख्या १ हजार ९५६, तर प्रवेश परीक्षा नसलेल्या अभ्यासक्रमांसाठी १ हजार ५१ अर्ज आले आहेत.

विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत मिळणार आहे.

### १२ ते १५ मेदरम्यान परीक्षा

■ प्रवेश परीक्षांसाठी अर्ज करण्याची मुदत २७ एप्रिलपर्यंत, तर परीक्षा नसणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी ३१ मेपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज दाखल करता येतील. १२ ते १५ मे दरम्यान प्रवेश परीक्षा होणार आहे. त्यासाठी कोल्हापूरसह सांगली, सातारा, पंढरपूर, सोलापूर, बेळगाव येथील एकूण १५ केंद्रांवर परीक्षा होणार आहे. त्याबाबतचे काम विद्यापीठाकडून सुरू असल्याचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

### दृष्टिक्षेपात प्रवेश क्षमता

| | | | |
|---|---|---|---|
| प्रवेश परीक्षा असलेले अभ्यासक्रम | २९ | प्रवेश क्षमता | १०५० |
| प्रवेश परीक्षा नसलेले अभ्यासक्रम | २१ | प्रवेश क्षमता | १८९० |

2 2 APR 2026


सकाळ

# विद्यापीठाच्या 'सैफ' केंद्राचा गौरव

कोल्हापूर, ता. २१ : भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) शिवाजी विद्यापीठाच्या कॉमन फॅसिलिटी सेंटर-सोफिस्टिकेटेड ॲनालिटिकल इन्स्टुमेंट फॅसिलिटीज (सीएफसी– सैफ) या विभागाच्या दर्जेदार कामगिरीची दखल घेतली.

विद्यापीठाच्या या केंद्रात उपलब्ध असलेली अत्याधुनिक उपकरणे आणि सुविधा यांची माहिती देणारी लघुचित्रफीत केंद्रीय विभागाने त्यांच्या समाजमाध्यमांच्या सर्व मंचावरून प्रदर्शित केली. अशाप्रकारे बहुमान मिळविणारे शिवाजी विद्यापीठाचे हे देशातील पहिलेच विद्यापीठ ठरले.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी-सैफ केंद्राची माहिती देणारी तीन मिनिटांची लघुचित्रफीत प्रदर्शित केली. लघुचित्रफीतीसमवेत लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाचे पाठबळ लाभलेल्या शिवाजी विद्यापीठ येथील सोफिस्टिकेटेड ॲनालिटिकल इन्स्टुमेंट फॅसिलिटीज'' हे केंद्र संशोधक, शैक्षणिक संस्था, उद्योगांना अत्याधुनिक विश्लेषणात्मक, वैशिष्ट्यपूर्ण सेवा पुरवित आहे. सैफ कार्यक्रमांतर्गत २०१४ मध्ये स्थापन झालेले हे केंद्र, अतिप्रगत उपकरणांच्या साहाय्याने अचूक विश्लेषण आणि नावीन्यपूर्णतेला चालना देऊन वैज्ञानिक संशोधनाला यशस्वीपणे बळकटी देत आहे.'



केंद्राच्या सर्व विज्ञानाभिमुख कामगिरीची केंद्रीय मंत्रालयाने दखल घेतल्याचा आनंद वाटत आहे. यापुढील काळात उपकरणांची संख्या वाढवून आणखी दर्जेदार, आधुनिक विश्लेषण सुविधा संशोधकांना देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

**- डॉ. ज्योतिप्रकाश यादव,**
संचालक, सैफ केंद्र